http://www.howtoexam.com

S.Y.B.A. Nov-08

Book Keeping & Account

**Con. 219-08.** **HJ-7276**

(3 Hours) **[ Total Marks : 100**

N.B. : (1) Question No **1** is **compulsory**.
(2) Attempt any other **four** questions from Question Nos. **2** to **8**.
(3) **Figures** to the **right** indicate marks.

1. Following is the Trial Balance of MISS NEHA as on 31-03-2007. **20**

| Debt | Rs. | Credit | Rs. |
|---|---|---|---|
| Furniture | 20,000 | Capital Account | 1,00,000 |
| Purchases | 1,50,000 | Interest Earned | 4,000 |
| Debtors | 2,00,000 | Sales | 3,21,000 |
| Salaries | 30,000 | Purchase Returns | 5,000 |
| Wages | 20,000 | Creditors | 1,20,000 |
| Rent | 15,000 | Provision for bad debts | 8.000 |
| Sales Returns | 10,000 | | |
| Bad debts written off | 7,000 | | |
| Drawings | 24,000 | | |
| Printing and Stationery | 8,000 | | |
| Insurance | 12,000 | | |
| Opening Stock | 50,000 | | |
| Office Expenses | 12,000 | | |
| | **5,58,000** | | **5,58,000** |

**Additional Information :—**
(a) Closing stock is valued at Rs. 6,000
(b) Depreciate furniture by 10% p.a.
(c) Provision for bad debt is to be created at 5% on Debtors.
(d) Outstanding salaries Rs. 3,000 and Office expenses Rs. 8,000
(e) Prepaid Insurance is Rs. 2,000.
(f) Stock used for personal use Rs. 6,000.

Prepare Trading and Profit and Loss Account for the year ended 31-03 2007 and Balance Sheet as on that date.

2. Pass Journal Entries to rectify the following errors— **20**
(a) Purchased goods from Mantri, Passed through sales book for Rs. 14,000
(b) Wages paid Rs. 23,000 for installation of new plant was debited to Wages account.
(c) Received one bill from Ajay Rs. 8,000, passed through bills payable book.
(d) A sales returns of Rs. 6,000 from Pawan was entered in the Purchase Day Book.
(e) Rs. 12,500 received from Subhash posted to the Credit of Suresh.

3. Give the Journal entries of the following transactions in the books fo Mr. Avdhoot :— **20**

| 2008 | | |
|---|---|---|
| February | 01 | He started business with cash Rs. 50,000, Furniture Rs. 10,000 and Building Rs. 1,40,000 |
| ,, | 04 | Purchased goods for cash Rs. 15,000 |
| ,, | 07 | Paid carriage Rs. 1,000 for above in cash |
| ,, | 10 | Sold goods to Mahendra on Credit Rs. 25,000 |
| ,, | 15 | Paid advertisement of Rs. 3,000 by cash |
| ,, | 17 | Deposited Cash into Bank Rs. 40,000 |
| ,, | 20 | Sold good for cash to Avtar Rs. 6,000. |
| ,, | 23 | Purchased computer from HCL on credit Rs. 40,000 |
| ,, | 25 | Paid Rs. 20,000 to HCL by cheque for above transaction |
| ,, | 29 | Paid Rent Rs. 2,500 by cheque Mr. Ajit. |

**[ TURN OVER**

College semester examination question papers for all subjects and branches

http://www.howtoexam.com



4. On 1st October, 2007, Arun owes to Rohini Rs. 12,000 and accepts three bills of Rs. 4,000 each due respectively in one, two and three months. The First bill is retained by Rohini and is duly met. The Second bill was discounted for Rs. 3,960 and is met in due course. The Third bill was endorsed to Vivek as he is creditors and is also met in due course. Pass journal entries in the books of Rohini for the above transactions. 20

5. From the following information, prepare a two column cash book (with Cash and Discount) of Mr. Atharva :— 20

| 2008 | | |
|---|---|---|
| March | 01 | Opening balance of cash Rs. 40,000 |
| ,, | 03 | Cash purchases for Rs. 15,000 |
| ,, | 08 | Paid Rs. 9,600 to Priyanka in settlement of her account for Rs. 10,000 |
| ,, | 12 | Cash sales amounted to Rs. 25,000 |
| ,, | 15 | Received from Tejas Rs. 24,000 in full settlement of Rs. 25,000 |
| ,, | 18 | Purchase a cycle for office use by cash Rs. 3,000 |
| ,, | 21 | Paid newspaper bill of Rs. 1,400 in cash |
| ,, | 24 | Received interest on investment of Rs. 1,500 in cash |
| ,, | 27 | Paid Salary to staff of Rs. 12,000 in cash |
| ,, | 31 | Cash in excess of Rs. 4,500 was paid into the Bank. |

6. M/s Diksha Enterprises purchased a small plant for Rs. 1,00,000 on 1st January, 2005. Additional plant was purchased on 1st July, 2005 for Rs. 70,000. On 1st July, 2006, the plant purchased on 1st January, 2005 having become obsolete, was sold for Rs. 50,000 on 1st April, 2007 a Fresh Plant was purchased for Rs. 1,50,000 and the plant purchased on 1st July, 2005 was sold at Rs. 65,000 on the same date.
Depreciation is to be provided @ 10% p.a. under Fixed Instalment system. M/s Diksha Enterprises close its accounts on 31st December, every year.
Prepare Plant Account for the year, 2005, 2006 and 2007. 20

7. Enter the following transaction in an analytical Petty Cash Book under Imprest system and balance it— 20

| 2007 | | | Rs. |
|---|---|---|---|
| December | 01 | Received a cheque towards petty cash | 1,800 |
| ,, | 02 | Paid carriage | 250 |
| ,, | 03 | Paid Taxi fare | 300 |
| ,, | 04 | Purchased stamps | 200 |
| ,, | 05 | Paid postage, telegram | 100 |
| ,, | 06 | Wages paid | 80 |
| ,, | 08 | Paid for repairs | 60 |
| ,, | 09 | Subscription for newspaper paid | 70 |
| ,, | 10 | Refreshments to Staff | 75 |

8. Write short notes on any **four** of the following :— 20
   (a) Ficititious Assets
   (b) Errors of Principle
   (c) Liabilities
   (d) Trial Balance
   (e) Causes of Depreciation
   (f) Bank Reconciliation Statement.

---

College semester examination question papers for all subjects and branches

http://www.howtoexam.com



**(मराठी रूपांतर)**

सूचना : (१) प्रश्न क्रमांक **१ आवश्यक** आहे.
(२) प्रश्न क्र. **२** ते **८** यापैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(३) **उजवीकडील** आकडे **गुण** दर्शवितात.
(४) **इंग्रजी** भाषेतील **मूळ** प्रश्न **प्रमाण** मानावेत.

१. कु. स्नेहाचे ३१-०३-२००७ रोजीचे तेरीजपत्रक पुढीलप्रमाणे आहे :— **२०**

| नावे | रु. | जमा | रु. |
|---|---|---|---|
| फर्निचर | २०,००० | भांडवल खाते | १,००,००० |
| खरेदी | १,५०,००० | मिळालेले व्याज | ४,००० |
| ऋणको | २,००,००० | विक्री | ३,२१,००० |
| पगार | ३०,००० | खरेदीपरत | ५,००० |
| मजुरी | २०,००० | धनको | १,२०,००० |
| भाडे | १५,००० | बूडीत कर्ज निधी | ८,००० |
| विक्री परत | १०,००० | | |
| बुडीत कर्ज खातेबाद | ७,००० | | |
| उचल | २४,००० | | |
| छपाई व लेखन साहित्य | ८,००० | | |
| विमा | १२,००० | | |
| सुरुवातीची शिल्लक | ५०,००० | | |
| कार्यालयीन खर्च | १२,००० | | |
| | **५,५८,०००** | | **५,५८,०००** |

**अतिरिक्त माहिती :—**

(अ) अखेरच्या शिल्लक मालाची किंमत ६,००० रु. आहे.
(ब) फर्निचर १०% प्रतिवर्ष घसारा आकारायचा आहे.
(क) ऋणकोंवर ५% इतका बुडीत कर्ज निधी निर्माण करा.
(ड) ३००० रु पगार आणि कार्यालयीन खर्च ८,००० रु. देय आहे.
(इ) विम्याचा २००० रु.चा हप्ता आगाऊ दिला आहे.
(फ) ६,००० रु.चा माल खाजगी कामासाठी वापरला आहे.

३१ मार्च २००७ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार आणि नफातोटा खाते तयार करुन त्याच दिवशीचा ताळेबंद तयार करा.

२. खालील चुकांच्या दूरुस्तीची रोजकीर्दीत नोंद करा :— **२०**

(अ) मंत्रीकडून रु. १४,००० च्या खरेदी केलेल्या मालाची नोंद विक्री पुस्तकात केली
(ब) नविन संयंत्र स्थापनेसाठीचा मजूरी खर्च रु. २३,००० ची नोंद मजूरी खात्याच्या नावे करण्यात आली.
(क) अजयकडून मिळालेल्या रु. ८,००० च्या प्राप्य हुंडीची नोंद देय हुंडीत केली.
(ड) पवनकडून आलेल्या रु. ६,००० च्या विक्री परताव्याची नोंद खरेदी रोजनिशीत केली.
(इ) सुभाषकडून मिळालेल्या रु. १२,५०० ची नोंद सुरेशच्या खात्यात जमा केले.



College semester examination question papers for all subjects and branches

http://www.howtoexam.com



३. श्री. अवधूत यांच्या रोजकीर्दीत खालील व्यवहारांच्या नोंदी द्या :— २०

| २००८ | | |
|---|---|---|
| फेब्रुवारी | ०१ | रोख रक्कम रु. ५०,०००, फर्नीचर रु. १०,००० व इमारत रु. १,४०,००० सह त्याने व्यवसाय सुरू केला. |
| ,, | ०४ | रु. १५,००० किंमतीचा माल रोखीने खरेदी केला. |
| ,, | ०७ | वरील खरेदीकरीता गाडीभाडे रु. १,००० रोख दिले. |
| ,, | १० | महेंद्रला रु. २५,००० किंमतीचा माल उधारीने विकला. |
| ,, | १५ | जाहिरातीचा खर्च रु. ३,००० रोख दिला. |
| ,, | १७ | रु. ४०,००० बँकेत रोख जमा केले. |
| ,, | २० | रु. ६,००० किंमतीचा माल श्री. अवतार यास रोखीने विकला. |
| ,, | २३ | एच्. सी. एल्. कडून रु. ४०,००० चा संगणक उधारीने खरेदी केला. |
| ,, | २५ | वरील व्यवहारापोटी रु. २०,००० चा धनादेश एच्.सी.एल.ला दिला. |
| ,, | २९ | श्री. अजीत यांना रु. २,५०० चा धनादेश भाड्यापोटी दिला. |

४. दि. १ ऑक्टोबर, २००७ रोजी रु. १२,००० अरुणला रोहिणीचे देणे होते आणि म्हणून त्याने एक, दोन व तीन महिन्याचा देय तारखेच्या रु. ४,००० च्या तीन हुंड्या स्वीकारल्या. पहिली हुंडी रोहिणीने स्वत:कडे ठेवली व ती देय तारखेला वटली. दुसऱ्या हुंडीचे तिने बँकेत रु. ३,९६० ला रोखीकरण (Discount) केले व सदर हुंडी देय तारखेला वटली. तिसरी हुंडी तिने तिचा धनको विवेक यांस पृष्ठांकीत (Endorsed) केली व हिसुध्दा हुंडी देय तारखेस वटली. २०

वरील व्यवहारांची नोंद रोहिणीच्या रोजकीर्दीत करा.

५. खालील माहितीच्या आधारे श्री. अथर्व यांचे रोकड व सूट रकाना असलेले दोन खणी खाते तयार करा :— २०

| २००८ | | |
|---|---|---|
| मार्च | ०१ | आरंभीची रोख शिल्लक रुपये ४०,००० |
| ,, | ०३ | रु. १५,००० ची रोखीने खरेदी केली. |
| ,, | ०८ | प्रियंकास रु. ९,६०० देऊन तिचे रु. १०,००० चे देणे चुकते केले. |
| ,, | १२ | रु. २५,००० ची रोखीने विक्री केली. |
| ,, | १५ | तेजसकरवी रु. २४,००० रोख घेऊन त्याचे रु. २५,००० चे खाते मिटविले. |
| ,, | १८ | कार्यालयीन कामकाजाकरीता रु. ३,००० ची सायकल रोखीने खरेदी केली. |
| ,, | २१ | वृत्तपत्र खर्च रु. १,४०० रोख दिला. |
| ,, | २४ | गुंतवणूकीवरील व्याज रु. १,५०० रोख मिळाले. |
| ,, | २७ | कर्मचाऱ्यांचे वेतन रु. १२,००० रोखीने दिले |
| ,, | ३१ | रु. ४,५०० पेक्षा जास्त असलेली रक्कम बँकेत जमा केली. |

६. मेसर्स दिक्षा एन्टरप्राइजेसने दि. १ जानेवारी, २००५ रोजी रु. १,००,००० किंमतीचे छोटे संयंत्र खरेदी केले. दिनांक १ जुलै, २००५ रोजी रु. ७०,००० किंमतीचे आधिक संयंत्र खरेदी केले. दि. १ जुलै, २००६ रोजी, दिनांक १ जानेवारी, २००५ रोजी खरेदी केलेले संयंत्र अप्रचलित (Obsolete) झाले म्हणून रु. ५०,००० ला विकले. दिनांक १ एप्रील, २००७ रोजी एक नवे संयंत्र रु. १,५०,००० ला खरेदी केले व त्याच दिवशी, दिनांक १ जुलै २००५ रोजी खरेदी केलेले संयंत्र रु. ६५,००० ला विकले. २०

संयंत्रावर १०% द.सा. दराने समान हप्ता पध्दतीने घसारा आकारावा, मेसर्स दिक्षा एन्टरप्रायजेस आपली खाती दरवर्षी दिनांक ३१ डिसेंबर रोजी बंद करतात. २००५, २००६ व २००७ या वर्षासाठीचे संयंत्र खाते तयार करा.

College semester examination question papers for all subjects and branches

http://www.howtoexam.com



७. अनामत ठेव पध्दती ( Imprest system ) रकान्याची किरकोळ खर्चाची रोकडकीर्द ( Petty Cash Book ) तयार करुन खालील व्यवहारांची नोंद करा व शिल्लक काढा :— २०

| २००७ | | | रु. |
|---|---|---|---|
| डिसेंबर | ०१ | किरकोळ खर्चासाठी चेक मिळाला | १,८०० |
| ,, | ०२ | गाडी भाडे दिले | २५० |
| ,, | ०३ | टॅक्सीभाडे दिले | ३०० |
| ,, | ०४ | पोष्टाची तिकीटे खरेदी केली | २०० |
| ,, | ०५ | टपाल व तारखर्च | १०० |
| ,, | ०६ | मजुरी दिली | ८० |
| ,, | ०८ | दुरुस्तीसाठी खर्च केले | ६० |
| ,, | ०९ | वर्तमानपत्राची वर्गणी दिली | ७० |
| ,, | १० | कर्मचाऱ्यांना अल्पोपहार दिला | ७५ |

८. पुढीलपैकी कोणत्याही **चारांवर** संक्षिप्त टिपा लिहा :— २०

(अ) नामधारी मालमत्ता (Fictitious Assets)

(ब) मुलतः चूका (Errors of Principle)

(क) देणे (Liabilities )

(ड) तेरीज पत्रक (Trial Balance )

(इ) घसाऱ्याची कारणे

(फ) बँक ताळमेळ पत्रक.

HowToExam.com

College semester examination question papers for all subjects and branches